# प्रकरण - दुसरे

# कोल्हापूर संस्थान - भौगोलिक पार्श्वभूमी

# कोल्हापूर संस्थान - भौगोलिक पार्श्वभूमी

कोल्हापूर हे दक्षिण महाराष्ट्रातील सर्वात मोठे संस्थान आहे. १७ व्या शतकात शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करुन महाराष्ट्राच्या इतिहासात नव्या युगाची सुरुवात केली. पुढे त्यांच्याच वंशजांनी म्हणजे संभाजी व राजाराम यांनी स्वातंत्र्य संग्रामाचा लढा सुरु ठेवला. ताराबाईने मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धात महत्वाची कामगिरी बजावली. नंतर कोल्हापूर राज्याची स्थापना इ. स. १७१० मध्ये केली. कोल्हापूर राज्याचे अस्तित्व तेव्हापासून ते २० व्या शतकाच्या प्रारंभापर्यंत टिकून राहिले. कोल्हापूर राज्याने महाराष्ट्राच्या इतिहासात १९ व्या व २० व्या शतकात महत्वाचे योगदान होते.

कोल्हापूर हे संस्थान अनेक क्षेत्रात आघाडीवर आहे. दरडोई उत्पन्नात दुसऱ्या स्थानावर आहे. समृद्धी निर्माण करण्याचा वारसा या प्रांताने जपलेला आहे. कोल्हापूर संस्थानात कृष्णा, मलप्रभा, घटप्रभा, पंचगंगा, हिरण्यकेशी, वेदगंगा, दूधगंगा आणि वारणा या सर्व नद्या पूर्ववाहिन्या वाहत असल्यामुळे सुपीक गाळाची जमीन तयार झालेली होती. तसेच अनेक किल्ले या प्रांतात असल्यामुळे कोल्हापूरला एक वेगळेच भौगोलिक स्थान निर्माण झाले आहे.

## भौगोलिक स्थान

कोल्हापूरचे भौगोलिक स्थान १७°-१०'-४५" व १५°-५०'-२०" उत्तर अक्षांश व - ७४° - ४४' - ११" व ७३° - ४३' - १६" रेखांश आहे.[1]

कोल्हापूर संस्थान हे पूर्वेला पटवर्धनांचे मिरज संस्थान व मुंबई प्रांताचे सांगली व चिकोडी हे पोटविभाग आणि पश्चिमेला रत्नागिरी जिल्हा, उत्तरेला सातारा आणि कोल्हापूरचे विभाजन करणारी वारणा नदी अशा चतु:सीमामध्ये वसले असून[2] त्याची

समुद्रसपाटीपासून उंची १८०० फूट आहे. या प्रांताची दक्षिण उत्तर लांबी ८० मैल व पूर्व – पश्चिम रुंदी ८ मैल आहे. या प्रातांचे एकंदर क्षेत्र ३१८४ चौरस मैल आहे.[३] आणि संस्थानच्या हद्दीतील डोंगर – टेकड्यांची उंची समुद्रसपाटीपासून २००० ते ३५०० फुटापर्यंत होती.[४] डोगंर, नद्या व जंगलसंपत्ती मुबलक प्रमाणात असल्याने या भागाला सहज सुंदर असे रम्य स्वरुप प्राप्त झाले होते. कोल्हापूर संस्थानच्या पश्चिमेकडे सह्याद्री पर्वताच्या डोंगररांगा व पूर्वबाजूस सपाट मैदानाची शेतजमीन आहे.[५]

कोल्हापूर प्रांताचे नैसर्गिक वैशिष्ट्ये म्हणजे त्यात सर्वत्र पसरलेल्या टेकड्या होय. या टेकड्या मूळ सह्याद्री पर्वताच्या १०० मैल पर्यंत पसरलेल्या डोंगरांनी व या मूळ पर्वताला जोडून ईशान्येकडे व पूर्वेकडे ३० ते ५० मैल लांबीचे जे फाटे आहेत. त्याने बनल्या आहेत. सह्याद्री पर्वत हा निसर्गनिर्मित भव्य वनश्रीने नटलेला आहे. लहान – लहान दरी–डोंगरांनी, झाडा – झुडपांनी हिरवागार, मोठ–मोठ्या गगनचुंबी डोंगरांचे सुळके प्रासाद शिखराप्रमाणे लागून राहिले आहेत. त्यातुन एखादे शिखर सर्वावर मध्येच एकदम ताण करुन खालील भूभागाकडे ताठ मानेने पाहत राहिलेले दिसते.[६]

कोल्हापूर प्रांतातील सह्याद्री पर्वताच्या पठारावर नऊ किल्ले आढळतात. त्यापैकी पहिला प्रचीतगड हा थेट उत्तरेरकडे असून त्याच्या दक्षिण बाजूस दोन मैलावर बहिरगड आहे. बहिरगडाच्या दक्षिणेकडे ८ मैलावर महिमतगड असून त्याच्या दक्षिणेस १२ मैलावर वाडीमापाल आहे. प्रसिद्ध विशाळगड किंवा खेळणा हा वाडीमापाल जवळच दक्षिणेकडे आहे. विशाळगड येथून ३० मैलावर दक्षिण बाजूस गगनबावड्याचा किल्ला असून त्याच्या दक्षिणेकडे १० मैलावर भैरवगड व १२ मैलावर रांगणा किल्ला आहे. याशिवाय पन्हाळा व सामानगड हे दोन प्रसिद्ध किल्ले कोल्हापूर प्रातांत आहेत.[७] कोल्हापूर प्रांताची हवा समशीतोष्ण आहे. पर्जन्यमान सरासरी ४०° इंच असते. सह्याद्री पर्वताच्या भागात झाडी

विपुल आहे. सागवान, हिरडा, नाना, किंजळ, ऐन व बांबु यांची पैदास मोठ्या प्रमाणावर होते.[८]

सह्याद्रीच्या पूर्वेकडील मावळच्या पट्ट्यात पंचगंगेच्या काठी हे संस्थान वसलेले आहे. पश्चिमेकडील डोंगराळ प्रदेश आणि पूर्वेकडील मैदानी प्रदेशांमध्ये कोल्हापूरचे स्थान असून सह्याद्रीच्या दोन शाखांमध्ये असल्यामुळे कोल्हापूरला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. कोल्हापूर प्रांताच्या उत्तरेकडे विशाळगड, पन्हाळा डोंगराची रांग असून, दक्षिणेकडे फोंडा–सावगांव रांग आहे. उत्तरेकडील रांग ही पंचगंगेच्या पलिकडे काही अंतरावर आढळते. पंचगंगेचे खोरे उत्तर व दक्षिणेच्या बाजूने ह्या दोन रांगांनी बंदिस्त असून, पश्चिमेस उंच सह्याद्रीची रांग आढळते. त्यामुळे तीन बाजूंनी बंदिस्त असलेले पंचगंगेच्या खोऱ्यामध्ये कोल्हापूर संस्थान वसलेले होते. आंबा, अणुस्कुरा, काजीर्डा, बावडा, फोंडा, रांगणा, अंबोली हे घाट असून, या घाटातून व्यापार होत असे.[९] मुबलक पाणी सुपीक शेती यामुळे आजही भाग सधन म्हणून ओळखला जातो.

## प्रादेशिक वैशिष्ट्ये

कोल्हापूरच्या पश्चिमेकडे असलेली सह्याद्रीची उत्तर रांग, मध्यावरील डोंगराळ प्रदेश व पूर्वेकडील मैदानी प्रदेश असे तीन विभाग पडतात. सह्याद्रीची रांग अरबी समुद्र किनाऱ्यास समांतर असून, पश्चिमेस तुटलेला कडा आहे. सह्याद्री हा हिमालयाप्रमाणे वली पर्वत नसून ती दख्खनच्या पठाराची पश्चिमेकडील उंचावलेला कडा आहे. पाऊस व वाऱ्याच्या माऱ्यामुळे कमी–अधिक प्रमाणात झीज होऊन त्यास पर्वताचे स्वरुप मिळालेले होते.[१०] डोंगराचे सपाट माथे व तुटलेले उंच कडे यामुळे या भागात अनेक प्रसिद्ध किल्ले आहेत. विशाळगड, बावडा, प्रचितगड, पन्हाळा, पावनगड, रांगणा, गंधर्वगड, मनोहरगड, महादेवगड यासारखे किल्ले असून, मुसलमानी आक्रमणाच्या काळात मराठी राज्याला याचा

खूप फायदा झाला. दुर्गम डोंगराळ प्रदेश, भरपूर पाऊस व घनदाट अरण्ये अशी नैसर्गिक परिस्थिती कोल्हापूर संस्थानला लाभलेली होती.[११]

## भौगोलिक विविधता

कोल्हापूर संस्थानात भौगोलिक विविधता दिसून येते. पश्चिम विभागात सह्याद्रीच्या रांगा येत असून जवळ जवळ अधिक मुलुख डोंगराळ आहे. त्यापैकी काही डोंगराची समुद्रसपाटीपासून उंची अधिक ९०० मीटर इतकी आहे.[१२] पश्चिमेच्या घाटमाथ्याच्या भागात सह्याद्रीतून उगम पावणाऱ्या नद्यांच्या खोऱ्यात समावेश होतो. कासारी, कुंभी, तुळशी, भोगावती व पंचगंगा ह्या नद्यांमुळे सपाट खोऱ्यांचा प्रदेश तयार झाला आहे. पश्चिमेला राधानगरी, पन्हाळा, बावडा, करवीर तालुका या भागातून येऊ अळते व शिरोळ या पूर्वभागातून वाहत जातात. तर भुदरगड तालुक्यातून दूधगंगा व वेदगंगा या नद्या वाहतात. पश्चिम विभागात विशेषत: पन्हाळा, भुदरगड व विशाळगड या भागात नैसर्गिकरित्या लागवडीखाली आणता येईल अशा तांबड्या जमिनी फार थोड्या आहेत. पूर्वेच्या अळते, शिरोळ, गडहिंग्लज, रायबाग व कटकोळ लगतच्या भागात, इचकरंजी व कागल जहागीरीचा प्रदेश काहीसा सपाट असून येथे उत्तम प्रकारची काळी जमीन आहे. सुमारे ८०% पेक्षा अधिक जमीन सुपीक असून तांदुळ, कापूस, ज्वारी व तंबाखु ही प्रमुख पिके घेतली जातात.[१३]

## प्रशासकीय विभाग

इ. स. १८९४ मध्ये करवीर संस्थानचे क्षेत्रफळ २३३४ चौरस मैल होते आणि त्यांच्या जहागीरदारीचा प्रदेश ८८३.१ चौरस मैल इतका होता.[१४]

कोल्हापूर संस्थानात पुढील पेठे व महालांचा समावेश होता. १) करवीर, २) पन्हाळा, ३) आळते, ४) शिरोळ, ५) भुदरगड, ६) गडहिंग्लज ७) रायबाग, ८)कटकोळ, ९) चनवाड, १०) राधानगरी–महाल याशिवाय १८६२ चा तहान्वये नऊ मांडलिक जहागीरदारांचा समावेश कोल्हापूर संस्थानात होता. १) कापशी, २) विशाळगड, ३) बावडा ४) इचलकरंजी ५) कागल (वरिष्ठ व कनिष्ठ) ६) हिम्मत बहादुर व सरलष्कर यांचा समावेश होता.[१५] कोल्हापूर संस्थानात राजधानीचे शहर धरुन १०६९ गांवे होती.

## नद्या आणि नद्यांची खोरी

कोल्हापूर प्रांतातील नद्या ओझ्याच्या बोटी किंवा माचवे चालवण्यासारख्या नाहीत. कृष्णा, घटप्रभा, पंचगंगा, हिरण्यकेशी, ताम्रपर्णी, मार्कंडी, वेदगंगा, वारणा, कार्वी, शाली, कासारी, जांभळी, धावनी आणि तुळशी या उपनद्या कोल्हापूर प्रांतात आहेत.

**१) कृष्णा :**

कोल्हापूर प्रांताच्या पूर्व सीमेवर सुमारे ३६ मैल ही नदी आहे. या नदीचे पात्र उथळ असून पावसाळ्यात दोन्ही किनाऱ्यावर पुष्कळ गाळ येऊन साचतो आणि त्यामुळे हिवाळ्यात या नदीच्या किनाऱ्यावर पिके चांगली येतात आणि या नदीस कोल्हापूर प्रांतातील सर्व नद्या येऊन मिळतात.

**२) घटप्रभा:**

गडहिंग्लज पेट्यातून ही नदी वाहत असून नदीच्या किनाऱ्यावर मळ्या नाहीत.

**३) पंचगंगा:**

कुंभी, कासारी, तुळशी, भोगावती आणि गुप्त सरस्वती या पाच नद्या मिळून ही नदी झाली असून तिला पंचगंगा असे म्हणतात. प्रयाग या ठिकाणापासून या नदीस पंचगंगा

असे म्हणत. पंचगंगा नदी कोल्हापूर, रुकडी, इचलकरंजी, शिरोळ गावाजवळून वाहत जाऊन कृष्णा नदीला मिळते. या नदीच्या पाण्यावर उसाचे पिक मोठ्या प्रमाणावर घेतले जाई.

**४) हिरण्यकेशी:**

ही नदी गडहिंग्लज पेट्यात उगम पावते. या नदीचे पात्र उथळ असून किनाऱ्यावर मळ्या आहेत. या नदीतील वाळू चांगली असे.

**५) वेदगंगा:**

वेदगंगा ही नदी भुदरगड पेट्यात उगम पावते. कागल प्रांतात या नदीच्या किनाऱ्यास मळ्या आहेत.

**६) दुधगंगा :**

दुधगंगा नदी भुदरगड पेट्यात उगम पावते. ही नदी करवीर, कागल, अळते आणि शिरोळ या तालुक्यातून चिक्कोडी तालुक्यात वाहत गेली आहे.

**७) वारणा:**

कोल्हापूर प्रांताच्या उत्तर सीमेवर ही नदी आहे. विशाळगड, पन्हाळा, आळते, शिरोळ यांच्याबाजूने वाहत जाऊन हरिपूर जवळ कृष्णेला मिळते.

या सर्व नद्यास उन्हाळ्यात पाणी कमी असते. ताम्रपर्णी, मार्कडी, कार्वी, शाली,कासारी, जांभळी, धावनी आणि तुळशी इ. लहान नद्याही कोल्हापूरमध्ये आहेत.

## कालवे

कोल्हापूर राज्यातील बागायती शेतीस पाणीपुरवठ्याकरिता मोठ्या नदींना कालवे किंवा धरणे बांधलेली नव्हती. त्यावेळी लहान लहान ओढ्यास धरणे बांधून हिवाळ्यात उस व भाजीपाला या पिकास पाणी पाजत असत.

## तळी

कोल्हापूर राज्यात रंकाळा हा तलाव होता. या तलावाचा परिघ ३ मैल असून खोली ३५ फूट आहे. याशिवाय पद्‌माळे, वरुणतीर्थ, कोटीतीर्थ यासारखे तलाव कोल्हापूर राज्यात होते.[१६]

कासारी, कुंभी, तुळशी व भोगावती या उपनद्यामुळे पंचगंगा नदीस जलनिस्सार क्षेत्र प्राप्त झाले आहे. पावसाळ्यात नद्यानाल्यांचे पूर हे कोल्हापूरचे वैशिष्ट्य आहे. उपनद्याचे पाणी पात्रात साचून राहते. त्यामुळे उच्च प्रतीची पुराची मैदाने तयार झालेली आहेत. त्याला 'मळई' असे म्हणत.[१७]

पठारावरील नद्या संथपणे वाहत असून लांब पल्यापर्यंत वाहत जातात. त्यामुळे प्रवाहाच्या दोन्ही बाजूस गाळाची जमीन तयार झाली आहे. व त्यामुळे ठिकठिकाणी कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बांधून शेतीला पाणी पुरवठा होत असे व यातून नगदी पिके घेतली जात.

## हवामान

कोल्हापूर प्रांत समुद्राच्या पृष्ठभागापासून १७९० फूट उंचीवर आहे. येथील हवा समशीतोष्ण आहे. घाटमाथ्याकडे झाडी पुष्कळ प्रमाणात असल्यामुळे पाऊस फार पडतो. त्यामुळे येथील हवा सपाट प्रदेशापेक्षा नेहमी थंड असते. परंतु सपाट मैदानात उन्हाळ्यात म्हणजे एप्रिल, मे, जून महिन्यात पुर्वेकडील वारा वाहतो आणि उष्मा फार होतो. सायंकाळी पश्चिम वारा वाहत असल्यामुळे हवेत गारवा असतो.[१८]

जून महिन्यापासून ऑक्टोबर महिन्यापर्यंत पश्चिमेकडून किंवा नैऋत्य दिशेकडून वारा सुटतो व नोव्हेंबरपासून फेब्रुवारीपर्यंत उत्तर आणि पूर्व दिशांनी वारा वाहत असल्यामुळे दऱ्यांमध्ये किंवा नदीवर खूप धुके पडते. मार्च, एप्रिल व मे महिन्यात या

प्रांतात पूर्वेकडून उष्णवारा वाहतो.[१९] कोल्हापूर प्रांतातील डोगंर ३००० फुटापेक्षा जास्त उंचीवर असल्यामुळे फार आल्हाददायक वातावरण असते.

## पाऊस

कोल्हापूर प्रांतात साधारणत: ४०° इंचापासून ४९° इंचापर्यंत पाऊस पडतो. परंतू तो सर्वच भागात सारख्याच प्रमाणावर पडत नाही. काही ठिकाणी कमी, काही ठिकाणी जास्त असा पाऊस पडतो. उदा. शिरोळ व अळते पेट्यात ५०० मिलीमिटर पाऊस पडत असे. तर सह्याद्री घाटाजवळच्या बावडा भागात ६०० मिलीमिटर पाऊस पडत असे. बावडा, भुदरगड, राधानगरी, आजरा या ठिकाणी सर्वात जास्त पाऊस पडत असे. पन्हाळा येथे ही जास्त पाऊस पडत असे. गडहिंग्लज आणि करवीर परिसरातही पाऊस कमी प्रमाणात पडे याऊलट अळते, शिरोळ, रायबाग व कटकोळ या भागात मात्र पाऊस कमी प्रमाणात पडत असे.[२०] कमी पावसाच्या प्रदेशात बऱ्याच वेळी पाटबंधाऱ्याच्या सोयीअभावी दुष्काळ निर्माण झालेला दिसतो.[२१]

पाऊस साधारणत: नेहमी एप्रिल महिन्यात सुरु होऊन जून, जुलै, ऑगस्ट, आणि सप्टेंबर महिन्यापर्यंत पडतो. पावसाळ्यात उष्णतापमान कमी असून हवा आल्हाददायक असते.[२२]

## जमीन

कोल्हापूर प्रांतात काळी, तांबडी, मळी आणि खारी अशा चार प्रकारची जमीन दिसते. काळी व तांबडी जमीन उत्तम प्रतीची मानली जाते. उत्तम प्रकारची काळी जमीन कृष्णा, वारणा, पंचगंगेच्या खोऱ्यात आढळते. तांबडी जमीन सह्याद्रीच्या उतरणीवर असून त्यात पाणी टिकवून ठेवण्याची क्षमता नसते त्यामुळे उतारास वाफे करुन जमीन करतात. अशी जमीन डोंगराच्या बाजूंनी व लहान मोठ्या खोऱ्यात मुख्यत्वे पन्हाळा भुदरगड

पेट्यात आणि विशाळगड बावडा संस्थानमध्ये आढळते. तांबड्या जमिनीमध्ये खते व रासायनिक द्रव्याचे प्रमाण फार कमी असल्याने त्या नापीक नसतात. त्यामध्ये नागली, वरी आणि भात इ. पिके घेतली जातात. डोंगरी जमीन बरीच वर्षे पड टाकून त्यात लागवड करावी लागते.[२३] जमिनीमध्ये ओलावा धारण करण्याची क्षमता नसल्याने तसेच उत्पादनाकरिता कमी प्रतीची असल्याने कोल्हापूर संस्थानात पडीक जमीनी फार मोठ्या प्रमाणावर होत्या.

## लागवडीखालील जमीन

लागवडीखाली येऊ शकणाऱ्या एकूण सुमारे १४४९.९ हजार एकर जमीनीपैकी फक्त २९४.२ हजार एकर जमीन लागवडीखाली होती व त्यापैकी बहुतांशी जमीन ज्वारी, बाजरी, वरी, तांदूळ यासारख्या कमी किंमतीच्या पिकासाठी वापरली जात असे. आणि राहिलेल्या जमिनीत भुईमूग, ऊस, तंबाखू ही पिके घेतली जात.[२४] एकूण लागवडीखाली असलेल्या जमीनीच्या फक्त २.७% जमीनीला वर्षातले काही महिनेच विहीरी, तलाव, नद्या याद्वारे पाणी मिळू शकत असे.[२५]

४,९०,६१८ एकर किंवा शेकडा ८७.७ एकर जमिनीत जिरायत पिके होती. ५३,८०८ एकर किंवा शेकडा ९.६ एकर जमिनीत भात शेती आणि १५,२९० एकर किंवा शेकडा २.७ एकर जमिनीत बागायत पिके होती.[२६]

## पिके

धान्य, कडधान्य, तेलबिया, भाजीपाला व बागायती पिके यांचे उत्पादन कोल्हापूर प्रांतात घेतले जात असे. धान्य उत्पादनामध्ये गहु, ज्वारी, मका, राळे, वरी, भात, तांदुळ ही पिके घेतली जात असते. तर कडधान्यामध्ये हरभरे, हुलगे, मुग, उडीद, चवळी व मटकी ही कडधान्ये घेतली जात. तेलबियांमध्ये जवस, करडई, भुईमूग, तीळ,कान्हळे,

एरंडी, मोहरी यांचा समावेश होतो. बागायती पिकांमध्ये ऊस, तंबाखू, कापूस यांचा समावेश होतो. याशिवाय हळद, मिरची, कांदा, लसूण, धने या पिकांचे सुद्धा उत्पादन कोल्हापूर संस्थानात घेतले जात असे.[२७]

प्राचीन काळापासून दक्षिण महाराष्ट्रातील 'दक्षिण काशी' या नावाने कोल्हापूर प्रसिद्ध आहे. सह्याद्रीच्या पूर्वेस १८७० फुट उंचीवर पंचगंगा नदीच्या तीरावर हे शहर वसले आहे. कोल्हापूरचे भौगोलिक स्थान, नैसर्गिक विविधता, चांगले हवामान, भरपूर पर्जन्यमान आणि अनेक नद्यांमुळे प्राप्त झालेले जलनि:सार क्षेत्र यामुळे शेतीचा विकास होण्यास अनुकूल अशी परिस्थिती निर्माण झालेली दिसते.

# संदर्भसूची

१) मोडक, बा. प्र., कोल्हापूर संस्थानचे गॅझेटियर, पुस्तक नं. २४ मुंबई इलाख्याचे गॅझेटियर, १८९०, पृ. १.

२) डॉ. घुगे, वि. बा., छत्रपती शाहुचे समाजवादी आर्थिक धोरण, रायटर्स को. ऑप सोसायटी, कोल्हापूर, १९७५, पृ. ४.

३) मोडक, बा. प्र. ,कोल्हापूर आणि कर्नाटक प्रांतातील राज्ये व संस्थाने यांचा इतिहास पुर्वार्ध भाग एक, १८७७, पृ. २

४) देशपांडे, करवीर राज्याचा इतिहास, श्री महाराणी ताराबाई टिचर्स कॉलेज, पुस्तकमाला नं. १, आर्युमान प्रेस, कोल्हापूर, १९३७, पृ. ४

५) चौधरी, के. के (संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, कोल्हापूर जिल्हा, दर्शनिक विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९, पृ. ४

६) देशपांडे, करवीर राज्याचा इतिहास, उपरोक्त, पृ. ५.

७) कित्ता, पृ. ६.

८) गुळवणी, मु. गो., दख्खन दौलत पन्हाळगड, कोल्हापूर, १९७५, पृ. ३९.

९) भिडे, ग. र. व पु. ल. देशपांडे (संपा), 'कोल्हापूर दर्शन' इंटरनॅशनल पब्लिशिंग सर्व्हिस पुणे, १९७१, पृ. ८९.

१०) कित्ता, पृ. ७३.

११) कित्ता, पृ. ७५.

१२) युनसन, एच. जे., जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ कोल्हापूर ॲन्ड एस. एम. सी. बॉम्बे प्रसिडेन्सी, १८९१, पृ. ५.

१३) कोल्हापूर संस्थान, रिपोर्ट ऑफ दि. इंडस्ट्रियल सर्व्हे ऑफ कोल्हापूर, एज्युकेशन सोसायटी प्रेस, भायखळा, मुंबई, १८९५, पृ. ३.

१४) घुगे, वि. बा. , उपरोक्त, पृ. ६.

१५) को. सं. सा. प्र. अ., १९२०–२१, पृ. १

१६) मोडक, बा. प्र., उपरोक्त, पृ. ४–७.

१७) चौधरी, के. के. (संपा.), उपरोक्त, पृ. ५.

१८) मोडक, बा. प्र., उपरोक्त, पृ. १२.

१९) कित्ता, पृ. १५.

२०) घुगे., वि. बा., उपरोक्त, पृ. ६.

२१) कोल्हापूर संस्थान, रिपोर्ट ऑफ दि इंडस्ट्रियल सर्व्हे, उपरोक्त, पृ. ३.

२२) कोल्हापूर नगरपालिका शंतसावत्सरिक महोत्सव ग्रंथ, जी. ए. कदम, चीफ ऑफिसर, १९५४. पृ. ३६.

२३) मोडक, बा. प्र., कोल्हापूर गॅझेटियर, उपरोक्त, पृ. २२३–२२४.

२४) घुगे, वि. बा., उपरोक्त, पृ. ७.

२५) महाराष्ट्र स्टेट, गॅझेटियर ऑफ इंडिया, कोल्हापूर जिल्हा, १९६०, पृ. ३०२.

२६) मोडक, बा. प्र., कोल्हापूर संस्थानचे गॅझेटियर, उपरोक्त, पृ. २२.

२७) मोडक, बा. प्र., कोल्हापूर आणि कर्नाटक प्रांतातील राज्ये व संस्थाने यांचा इतिहास, उपरोक्त, पृ. १४.